**<u>प्रेस नोट ता. ०९/०४/२०२५</u>**

**अमित उर्फ पप्पू अप्पासाहेब आडके सोलापूर व धाराशीव जिल्हयातून ०२ वर्षांकरीता तडीपार**

इसम नामे, अमित उर्फ पप्पू अप्पासाहेब आडके, रा. किरकीरी आई चौक, मु.पो. देगांव, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर यांचेविरुध्द सन २०१२, २०१९ व २०२४ या कालावधीमध्ये गैरकायद्याची मंडळी जमा करुन दंगा व मारामारी करणे, खुन करणे, जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे यासारखे गुन्हे दाखल असल्याने त्याचेविरुध्द फौजदार चावडी पोलीस ठाणेकडून महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वयेचा तडीपार प्रस्ताव पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ), सोलापूर शहर यांना सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्तावाचे अनुषंगाने श्री विजय कबाडे, पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ), सोलापूर शहर यांनी कार्यवाही करुन, त्यांचेकडील तडीपार आदेश क्र.८२४/२०२५ दि.२८/०३/२०२५ अन्वये, इसम नामे, अमित उर्फ पप्पू अप्पासाहेब आडके, रा. किरकीरी आई चौक, मु.पो. देगांव, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर यास सोलापुर व धाराशीव जिल्हा येथून दोन वर्षांकरीता तडीपार केले आहे. त्यास तडीपार केल्यानंतर नवी मुंबई येथे सोडण्यात आलेले आहे.

( एन. एस. कानडे)
पोउपनि,वाचक अधिकारी,
पोउपआ परिमंडळ कार्या.सोलापूर शहर.

